**भूसंपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार खाजगी जमिनीच्या भूसंपादन प्रकरणी मुल्यांकनासाठी समिती गठीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्रमाकः- संकीर्ण- २०२६/प्र.क्र.०३/भूसंपादन-४**
**मंत्रालय, मुंबई**
**दिनांक:- २४ फेब्रुवारी, २०२६**

**प्रस्तावना:-**

राज्यामध्ये विविध प्रकल्पांसाठी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये खाजगी जमिनींचे भूसंपादन करण्यात येते. सदर भूसंपादन प्रक्रियेमध्ये जमिनी व अनुषांगिक बाबीचे मुल्यांकन करण्यास विलंब होत असल्याने भूसंपादन निवाडा प्रक्रिया व्यपगत होणे, प्रकल्प खर्चात वाढ होणे वा प्रकल्प पुर्णत्वाचा कालावधी वाढणे अशा बाबी शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत. यास्तव संयुक्त मोजणीनंतर तातडीने मुल्यांकन निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त पार्श्वभूमीवर भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत संपादित करण्यात येणा-या खाजगी जमिनीच्या भूसंपादन प्रकरणी जमिनीशी निगडीत मालमत्ता, पिके, वनझाडे, फळझाडे, जलसंपदा, विहिरी वा तत्सम इत्यादी बाबींचे मुल्यांकन निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

**(अ) जिल्हास्तरीय मुल्यांकन समिती**

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत खाजगी जमिनीच्या भूसंपादन प्रकरणी जिल्हास्तरीय मुल्यांकन समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| १) जिल्हाधिकारी | - अध्यक्ष |
| २) अधिक्षक अभियंता (जलसंपदा) | - सदस्य |
| ३) अधिक्षक अभियंता (सार्वजनिक बांधकाम) | - सदस्य |
| ४) जिल्हा कृषी अधिकारी (कृषी विभाग) | - सदस्य |
| ५) जिल्हा वन अधिकारी (वन विभाग) | - सदस्य |
| ६) उपअधिक्षक, भुमी अभिलेख | - सदस्य |
| ७) सह जिल्हा निबंधक (मुद्रांक जिल्हाधिकारी) | - सदस्य |
| ८) सहायक संचालक, नगर रचना | - सदस्य |
| ९) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)/भूसंपादन अधिकारी | - सदस्य सचिव |

**(ब) समितीची कार्यकक्षा**

१. भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत खाजगी जमिनीच्या भूसंपादन प्रकरणी संयुक्त मोजणी झाल्यानंतर १ आठवड्याच्या आत संबंधित भूसंपादन अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विविध बाबींचे मुल्यांकन अंतिम करण्यासाठी बैठक आयोजित करतील.
२. सदर बैठकीसाठी मुल्यांकनाशी निगडीत बाबींशी संबंधित जिल्हास्तरीय विभाग प्रमुख त्या त्या बाबींचे मूल्यांकनाचे प्रस्ताव संबंधित भुसंपादन अधिकाऱ्यामार्फत उक्त समितीसमोर सादर करतील. सदर समितीने अंतिम केलेल्या अशा प्रस्तावाबाबतचे इतिवृत्त त्याच दिवशी अंतिम करण्याची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुख व भुसंपादन अधिकारी यांची राहील.
३. भूसंपादनामध्ये समाविष्ठ तथापि मुल्यांकन कार्यपध्दती निश्चित न झालेल्या बाबींसाठी जिल्हाधिकारी धोरण ठरविण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित प्रशासकिय विभागास सादर करतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०२२४१२५१३९२४१९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

SHEETAL HARISH BHINGARDIVE

Digitally signed by SHEETAL HARISH BHINGARDIVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=811b70a9102967f853cc2b6ab33320a888d0446944cd32c5cbfea46ce603f707, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ABE1BF07925DA1BBAAACCA3C449FDCB0DFCA751E843E7D822224CFDBFE0D8669, cn=SHEETAL HARISH BHINGARDIVE
Date: 2026.02.24 12:52:33 +05'30'

**(शितल भिंगारदिवे)**
**सहायक संचालक, नगर रचना तथा**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय,मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, उप मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई.
४. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे प्रधान सचिव, उप मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई.
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. मा. अपर मुख्य सचिव (वने, भूसंपादन) यांचे स्वीय सहायक,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. मा. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. मा. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१२. सह सचिव (भूसंपादन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

१३. सर्व विभागीय आयुक्त
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६. सर्व सह आयुक्त (पुनर्वसन), विभागीय आयुक्त कार्यालय
१७. सर्व भूसंपादन अधिकारी
१८. सर्व अधिक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम / जलसंपदा)
१९. सर्व सह जिल्हा निबंधक
२०. सर्व जिल्हा कृषी अधिकारी
२१. सर्व जिल्हा वन अधिकारी
२२. सर्व उप अधिक्षक भूमी अभिलेख
२३. निवडनस्ती - (भूसंपादन - ४)